# नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (स्थापना विभाग)

जाहिरात क्र.599/ज.स./2019 दि. 28/ 12/2019

# <u>जाहीरात</u>

**<u>अनुसूचीत जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम-२०१९-२०२०</u>**

**<u>महाराष्ट्र शासन निर्णय क्र बी.सी.सी.-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर २०१९</u>**

उपरोक्त शासन निर्णयानुसार नागपूर शहर महानगरपालिका, नागपूर आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी प्रस्तुत जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे अनुसूचीत जमातीच्या, जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवाराकडून पदाची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा—या पात्र उमेदवारांकडून ऑफ लाईन पध्दतीने नागपूर महागनरपालिकेच्या आस्थापना विभाग कार्यालयीन वेळेत (सकाळी 10.30 ते सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत) सादर करावे.

अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी दि. 08/01/2020 ला सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत स्थापना विभाग, महानगरपालिका, नागपूर येथे पोस्टाने / कुरियर/स्वतःकडून प्राप्त झालेले अर्जच फक्त स्विकारले जातील. त्यानंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाने /कुरियरने व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जाचा विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

| | |
|---|---|
| अर्ज स्विकाराण्याची तारीख | मंगळवार दि. 31/12/2019 पासुन |
| अर्ज भरण्याची शेवटची तारीख | बुधवार दि. 08/01/2020 |
| अर्ज / परिक्षा शुल्क | रू. 150 /— (नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे नावाने धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) स्विकारण्यात येईल.<br>तसेच व्यक्तीशः अर्ज सादर केल्यास धनाकर्षाद्वारे तसेच रोखेने शुल्क स्विकारले जाईल. माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. |
| अर्जाचा पत्ता | मा. आयुक्त, नागपूर, महानगरपालिका, नागपूर,<br>स्थापना विभाग, 1 ला माळा, नवीन प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर पिन कोड 440001 या नावाने अर्ज करावा. |

## <u>भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना</u>

### <u>भरावयाच्या रिक्त पदांचा तपशील</u>

| अ. क्र | पदाचे नांव | वेतन श्रेणी ग्रेड पे | एकुण पद संख्या | महिला आरक्षण | अपंग | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | खेळाडू | अनाथ | समांतर आरक्षण व्यतिरीक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 30 % | 4 % | 15 % | 10 % | 5 % | 2 % | 5 % | 1 % | |
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 9300—39100 ग्रेड पे 4300 | 04 | 01 | 0 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 |
| 2 | राजस्व निरीक्षक | 9300—39100 ग्रेड पे 4200 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |
| 3 | पब्लीक हेल्थ नर्स | 9300—39100 ग्रेड पे 4300 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |
| 4 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | 5200—20200 ग्रेड पे 2400 | 07 | 02 | 0 | 01 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 03 |
| 5 | आशुलिपीक (मराठी) | 5200—20200 ग्रेड पे 2400 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |
| 6 | रेखानुरेखक (ट्रेसर) | 5200—20200 ग्रेड पे 2000 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |
| 7 | वाहन चालक (लॉरी ड्रायव्हर) | 5200—20200 ग्रेड पे 1900 | **02** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |

| अ. क्र | पदाचे नांव | वेतन श्रेणी ग्रेड पे | एकुण पद संख्या | महिला आरक्षण | अपंग | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | खेळाडू | अनाथ | समांतर आरक्षण व्यतिरीक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | कनिष्ठ लिपीक | 5200–20200 ग्रेड पे 1900 | **08** | 02 | 0 | 01 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 04 |
| 9 | मिटर रीडर/मोहरीर/ कर संग्राहक/ | 5200–20200 ग्रेड पे 1900 | **09** | 03 | 0 | 01 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 04 |
| 10 | फायरमन | 5200–20200 ग्रेड पे 1900 | **04** | 01 | 0 | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 |
| 11 | टेलिफोन ऑपरेटर/ पी.बी.एक्स ऑपरेटर | 5200–20200 ग्रेड पे 1900 | **03** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 |
| 12 | सहायक. मेक्यॉनिक | 5200–20200 ग्रेड पे 1900 | **01** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |
| 13 | शिक्षण सेवक प्राथमिक (वर्ग १ ते ५) (शिकविण्याचे माध्यम - हिंदी) | एकत्रीत मानधन रू. 6000/– | **17** | 05 | 01 | 03 | 02 | 01 | 0 | 01 | 0 | 04 |
| 14 | शिक्षण सेवक निम्न श्रेणी माध्यमिक (शिकविण्याचे माध्यम - इंग्रजी) | एकत्रीत मानधन रू. 6000/– | **01** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 01 |
| 15 | शिक्षण सेवक माध्यमिक (विषय- विज्ञान) वर्ग ९ते १० | एकत्रीत मानधन रू. 8000/– | **03** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 |

वरील तक्यांत नमूद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुषंगीक बाबींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**<u>पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता :–</u>**

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठाची सिव्हील इंजिनिअरींगमधील डिग्री (पदवी) किंवा डिप्लोमा (पदविका) किंवा शासनाद्वारे मान्यताप्राप्त तत्सम पात्रता.<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |
| 2 | राजस्व निरीक्षक | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधर.<br>शासनाचा महानगरपालिका किंवा नगरपालिका यांचा कामाचा 2 वर्षाचा अनुभव.<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |
| 3 | पब्लीक हेल्थ नर्स | 1. इंडियन नर्सीग कॉन्सीलचा मान्यताप्राप्त बेसीक नर्सीग कोर्स नंतर पब्लीक हेल्थ नर्सीसचे प्रमाणपत्र किंवा इंडियन नर्सीग कॉन्सीलची मान्यतप्राप्त बी.एस.सी. नर्सीगमधील पदवी., महाराष्ट्र नर्सीग कॉन्सील अंतर्गत पंजीबंध्द.<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |
| 4 | स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | मॅट्रीक पास व आय.टी.आय. कोर्स पास (सिव्हील इंजिनिअरींग बिल्डींग कन्स्ट्रकशन ट्रेड मधील 2 वर्षाची परिक्षा पास झाल्याचे प्रमाणपत्र) व किमान 2 वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव अशी अर्हता जाहीरात देतांना आवश्यक राहील.<br>तसेच उपरोक्त शैक्षणिक अर्हतेपक्षा जास्त शैक्षणिक अर्हताधारण स्थापत्य अभियांत्रीकी पदविका/पदवी धारण करणा–या उमेदवारांना अर्ज करतांना अनुभवाची अट राहणार नाही,<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |
| 5 | आशुलिपीक (मराठी) | 1. मॅट्रीक, आशुलिपीक मराठी कमीत–कमी 100 शब्द प्रती मि.ची मराठीची परीक्षा पास<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |
| 6 | रेखानुरेखक (ट्रेसर) | 1. मॅट्रीक, व आय.टी.आय मधील ट्रेसरची/ सर्व्हेअर /सिव्हील ड्राफ्टसमन प्रमाणपत्र मधील परिक्षा पास झाल्याचे प्रमाणपत्र तसेच त्याला दोन वर्षाचा या कामातील प्रत्यक्ष अनुभव.<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |
| 7 | वाहन चालक (लॉरी ड्रायव्हर) | आठवा वर्ग पास व जड व हलके वाहन चालविण्याचा परवानाधारक, मोटार चालविण्याचा व मेक्यानिकचा 3 वर्षाचा अनुभव. |
| 8 | कनिष्ठ लिपीक | एस.एस.सी व टायपिंग मराठी–30,श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि.<br>तसेच एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण. |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>पदनाम</th><th>शैक्षणिक अर्हता</th></tr>
<tr><td>9</td><td>मिटर रीडर/मोहरीर/<br>कर संग्राहक</td><td>एस.एस.सी व टायपिंग मराठी–30,श.प्र.मि. व इंग्रजी 40 श.प्र.मि.<br>तसेच एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण.</td></tr>
<tr><td>10</td><td>अग्निशामक विमोचक</td><td>अ) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता :–<br>1. माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा.<br>3. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>4. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br><br>ब) किमान शारिरीक पात्रता :–<br>1. उंची 165 से.मी. (महिला उमेदवारासाठी उंची 162 से.मी.)<br>2. छाती – साधारण 81 से.मी. फुगवुन 5 से.मी. जास्त. (महिला उमेदवारासाठी लागु नाही. )<br>3. वजन 50 कि.ग्रॅ.<br>4. दृष्टी – चांगली.<br>क) वयोमर्यादा :– उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा जास्त नसावे.</td></tr>
<tr><td>11</td><td>टेलिफोन ऑपरेटर /<br>पी.बी.एक्स ऑपरेटर</td><td>1. मॅट्रीक, व टेलिफोन ऑपरेटरचा कामाचा 3 वर्षाचा या कामातील प्रत्यक्ष अनुभव.<br>2. 2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण.</td></tr>
<tr><td>12</td><td>सहायक मेक्यॉनिक</td><td>1. मॅट्रीक व आय.टी.आय. येथील मेक्यॉनिकलचा डिप्लोमा तसेच 2 प्रत्यक्ष अनुभव.<br>2. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण.</td></tr>
<tr><td>13</td><td>शिक्षण सेवक प्राथमिक<br>(वर्ग १ ते ५)<br>(शिकविण्याचे माध्यम - हिंदी)</td><td>मान्यताप्राप्त मंडळाचे किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो) किंवा<br><br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षाची प्राथमिक शिक्षणातील (B.EI.Ed.) किंवा<br><br>मान्यताप्राप्त मंडळाचे किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि दोन वर्षाची प्राथमिक शिक्षण शास्त्र पदवीका (विशेष शिक्षण) परिक्षा उत्तीर्ण राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून उत्तीर्ण किंवा<br><br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यताप्राप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४०%) उच्च माध्यमिक शिक्षण शास्त्र दोन वर्षाची पदवीका (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो) किंवा<br><br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परिक्षा किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड. परिक्षा उत्तीर्ण<br><br>(टिप- जे उमेदवार बी.एड. ही पात्रता पूर्ण करीत असतील त्याचा विचार नियुक्तीसंदर्भात इ.१ ली ते ५वी च्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून करण्यात येईल. तथापि, त्यांनी सहा महिन्याचा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचा प्राथमिक शिक्षण शास्त्रातील अभ्यासक्रम Bridge Course पूर्ण केलेला असणे बंधनकारक आहे.)<br><br>तसेच<br><br>१. शालांत परिक्षा हिंदी माध्यमातून (प्रथम भाषा हिंदी) उत्तीर्ण करणे आवश्यक<br><br>२. अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) दिलेली असणे व त्यापूर्वी शिक्षक पात्रता परिक्षा (TET) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>14</td><td>शिक्षण सेवक निम्न श्रेणी माध्यमिक<br>(शिकविण्याचे<br>माध्यम - इंग्रजी)</td><td>मान्यताप्राप्त मंडळाचे किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो) किंवा<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षाची प्राथमिक शिक्षणातील (B.EI.Ed.) किंवा<br>मान्यताप्राप्त मंडळाचे किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि दोन वर्षाची प्राथमिक शिक्षण शास्त्र पदवीका (विशेष शिक्षण) परिक्षा उत्तीर्ण राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून उत्तीर्ण किंवा</td></tr>
</table>

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| | | राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यताप्राप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४०%) उच्च माध्यमिक शिक्षण शास्त्र दोन वर्षाची पदवीका (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो) **किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परिक्षा किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड. परिक्षा उत्तीर्ण.<br>(**टिप**- जे उमेदवार बी.एड. ही पात्रता पूर्ण करीत असतील त्याचा विचार नियुक्तीसंदर्भात इ.१ ली ते ५वी च्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून करण्यात येईल. तथापि, त्यांनी सहा महिन्याचा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचा प्राथमिक शिक्षण शास्त्रातील अभ्यासक्रम Bridge Course पूर्ण केलेला असणे बंधनकारक आहे.)<br>तसेच<br>१. शालांत परिक्षा इंग्रजी माध्यमातून (प्रथम भाषा इंग्रजी) उत्तीर्ण करणे आवश्यक<br>२. अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) दिलेली असणे व त्यापूर्वी शिक्षक पात्रता परिक्षा (TET) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| 15 | शिक्षण सेवक माध्यमिक (विषय- विज्ञान)<br>वर्ग ९ते १० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र/ रसायनशास्त्र/ वनस्पतीशास्त्र/ प्राणीशास्त्र/ जीव विज्ञान (Life Sciences)/ पर्यावरणशास्त्र/ सुक्ष्मजीव शास्त्र (Micro Biology) / जैवतत्रज्ञान (Bio-technology) / जीव रसायनशास्त्र (Bio-chemisry) /कृषी शास्त्र विषयातील पदवी परिक्षा किंवा सामान्य पदवी परिक्षा अंतीम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह (अनुसूचित जमातीसाठी ४५%) उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) परिक्षा उत्तीर्ण **किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतुन ४ वर्षाची पदवी परिक्षा B.Sc.Ed. ( किंवा समकक्ष) संबंधीत विषयातुन किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण. (अनुसूचित जमातीसाठी ४५%)<br>अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) दिलेली असणे अनिवार्य आहे. |

**आवश्यक सूचना :–**

1. अनुसूचीत जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय अर्ज स्विकारल्या जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.
2. वरील पदांपैकी ज्या पदांना लेखी परिक्षा आवश्यक असेल त्यां पदांसाठी लेखी परिक्षेचीबाबतीच माहिती तसेच पदनिहाय परिक्षेचा अभ्यासक्रम व अभ्यासक्रमानुसार गुणदर्शक तक्ता वेगळयाने नागपूर महानगरपालकेच्या वेबसाईटवर www.nmcnagpur.gov.in प्रसिध्द करण्यात येईल.
3. भरती प्रक्रियेमध्ये एकुण पदनामामध्ये व रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया /परिक्षा स्थगीत करणे किवां रद्द करणे, परिक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणांत अंशतः बदल करणे तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद तक्रारीबाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना राहतील.

- **लेखी परिक्षेचा दर्जा / स्तर :**

1. लेखी परिक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांचा सेवाप्रवेश नियमांमध्ये विहीत करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.
2. ज्या पदाकरीता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदाकरीता भारतातील मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता 12 वी) दर्जाचा समान राहील.

- **लेखी परिक्षेद्वारे निवडीची कार्यपध्दती :**

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि. 13 जुन 2018 नुसार गट–क संवर्गातील पदे भरतांना खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

1. अनुसूचीत जमाती प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांनाच नियुक्ती देण्यात येईल.
2. लेखी परिक्षेत किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. त्यांच गुणवत्तेनुसार निवड सूची तयार करण्यात येईल.
3. लेखी परिक्षेत समान असल्यास शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

- **<u>सर्वसाधारण सूचना :–</u>**

सामाजीक व समांतर आरक्षणाचे अनुषंगाने महत्वाचे सूचना :–

1. महिला आरक्षण :– महिला व बालकल्याण विभागाकडील शासन निर्णय क्र. 82/2001/म.से.आ–2000/प्र.क्र. 415/का.2 दि. 25/05/2001 मधील तरतुदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील.. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी तशी मागणी ऑफलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे.
2. उमेदवार भारताचा नागरीक असावा.
3. उमेदवार हा महाराष्ट्राचा राज्याचा रहीवासी असावा (डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक)

**4. वयोमर्यादा :–**

**अ)**

| | |
|---|---|
| **1** | अर्जदाराने अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहीत वयोमर्यादा आवश्यक आवयश्क किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील. |
| **2** | उमेदवाराची विहीत वयोमर्यादा अर्ज करण्याचा अंतीम दिनांक 08/01/2020 रोजीचे वय विचारातघेवून गणले जाईल. |
| **3** | अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांक 08/01/2020 रोजी उमेदवाराचे वय 18 वर्षे पेक्षा कमी नसावे व 43 वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| **4** | अग्निशामक विमोचक या पदासाठी वयोमर्यादा ही तक्त्यांत दर्शविल्यानुसार राहील. |

**ब)**

- सामाजिक व समांतर आरक्षणाकरीता वयोमर्यादा ही शासन निर्णयनुसार राहील. तथापि संबंधीत अर्जदाराने त्या–त्या सामाजीक समांतर आरक्षणा अंतर्गत अर्जात व पाकीटावर तसा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक राहील.
- सामाजिक आरक्षण समांतर आरक्षण, मागास प्रवर्ग/नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र,भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, अपंग महिला, माजी सैनिक खेळाडु, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या /येणाऱ्या शासन निर्णयाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात येईल.

**5. अर्ज करण्याची पध्दत व इतर सुचना :–**

1 अर्ज विहीत नमुन्यात परिपूर्ण व अचुक माहीती व सर्व संबंधीत दस्ताऐवज स्वयंसाक्षांकित करून अर्जासोबत सादर करावे.

2 अर्जाचा नमुना नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

3 अर्जासोबत अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो 2 प्रतीमध्ये सोबत जोडावे.

4 परिक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. ओळखपत्र म्हणून पॅनकार्ड, आधारकार्ड, इलेक्शन कार्ड इ. सोबत आणावे

5 अनुभव प्रमाणपत्र (मोघम नको) तसेच संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे.

6 शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधीका–याची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अर्जात विभाग प्रमुखांनी दिलेल्या परवानगीचा क्रमांक व दिनांक नमूद करणे आवश्यक आहे.

7 अंशकालीन उमेदवारांना सेवायोजन कार्यालयात नोंदणी केल्याचे विहीत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

8 उमेदवार ही महाराष्ट्रातील रहीवासी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याचे अधिवास प्रमाणपत्र प्राधीकृत अधिका–याकडून घेतलेले असावे. अधिवास प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

9 प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा–या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबीं नमूद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमूद केलेल्या असल्यास त्या प्रचलीत शासन निर्देशानुसार /निर्णयानुसार लागु राहतील.

10 कोणत्याही कारणास्तव पदे कमी /जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. तसेच सदहु पदे जसे–जसे रिक्त होतील त्या नुसार नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.

11 सदर निवड प्रक्रियेत नियुक्ती किंवा पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी

12 परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबतचे सर्व अधिकारी मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांनी स्वतःकडे राखुन ठेवलेले आहे. याबाबत कोणलाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

13 वेगवेगळया पदासाठी वेग–वेगळा अर्ज करावा लागेल तसेच अर्जासोबत वेग–वेगळा परिक्षा शुल्क भरावा लागेल. पंरतु एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.

14 निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

15 या जाहीरातील नमूद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

16 भरती प्रक्रिये संबंधी देण्यात येणा–या सुधारी व अद्यावत सूचना कार्यालयीन फलकावर व www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

17 जाहीरातीमधील काही बाबींविषयी शंका असल्यास त्यांनी संबंधीत खातेप्रमुखा सहा. आयुक्त (साप्रवि) यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.

18 उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, पात्रता वर्गवारी, जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी तपासुन अर्ज करावा.

19 कोणत्याही अर्ज करणारा उमेदवार विहीत शैक्षणीक अर्हता ,पात्रता धारण करीत नसल्याने किंवा त्यांचे चारीत्र्य व पूर्व चारीत्र्य बरोबर नसल्याने आढळल्यास त्यांची उमेदवारी/नियुक्ती कोणत्याही टप्पावर रद्द करण्यात येईल

20 निवड झालेल्या उमेदवाराची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द करण्यात येईल.

21 महिलांचे आरक्षण हे त्या–त्या संवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरीता आरक्षित पदासाठी त्या–त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत. तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या–त्या प्रवर्गातील पुरूष उमेदवारामार्फत भरण्यात येईल.

22 उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे ( सेवायोजन कार्यालयाकडे / एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय,/जिल्हा सैनिक कार्यालय व प्रकल्पग्रस्तांनी जिल्हा पुनर्वसन कार्यालय) येथे नोंदवले असेल तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

23 सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्र.अ.क्र. 1005/प्र.क्र. 36/05/16–अ दि. 26/05/2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. (अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा लागु नाही असे नमूद करून सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.)

**हस्ता/– अभिजीत बांगर**
**आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

# नागपूर महानगरपालीका ,नागपूर

## अनुसुचित जमाती प्रवर्गाची विशेष भरती मोहीम 2019–2020

### अर्जाचा नमुना

**प्रति,**

**मा.आयुक्त,**

**महानगरपालीका ,नागपूर.**

**विषय :– ..........................................................................या पदासाठी अर्ज.**

**संदर्भ :– दैनिक..................................................वृत्तपत्रात प्रकाशीत झालेली जाहिरात.**

**उपरोक्त जाहिरातीचे संबंधाने मी..................................................................या पदासाठी अर्ज करीत आहे व आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे पुर्ण नाव | नांव | | वडीलांचे नाव | | | आडनाव | | |
| | (मराठीमध्ये) | | | | | | | | |
| | (नाव प्रथम) (इग्रंजीमध्ये) | | | | | | | | |
| 2 | पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वणी क्रमांक व ई–मेल आय.डी | ........................................................................................................<br>........................................................................................................<br>........................................................................................................<br>पिन कोड क्र.........................................<br>ई–मेल आय.डी ..........................................................<br>भ्रमनध्वनी क्रमांक ............................................................................ | | | | | | | |
| 3 | प्रवर्ग,जात/पोटजात | अनुसुचित जमाती | | | | | | | |
| 4 | जात वैधता प्रमाणपत्र() | आहे | | नाही | | असल्यास क्रमाक नमुद करावा | | | |
| | | | | | | | | | |
| 5 | जन्म तारीख (अंकात) | D | D | M | M | Y | Y | Y | Y |
| | | | | | | | | | |
| | जन्मतारीख( अक्षरात ) :– | | | | | | | | |
| 6 | दिनांक 05/01/2020 रोजी वय | | | | | | | | |
| 7 | जन्म ठिकाण | गाव | | तालुका | | जिल्हा | | | |
| 8 | उमेदवार खालील प्रवर्गापैकी असल्यास संबधित प्रवर्ग नमूद करावा ( ) अशी खुण करावी<br>अ) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय ? (अधिवास प्रमाणपत्र जोडावे) होय/नाही<br>ब)उमेदवार पुरुष आहे की स्त्री होय/नाही<br>क)माजी सैनिक आहात काय? होय/नाही<br>असल्यास नाव नोंदणी सैनिक कल्याण बोर्ड यांचेकडे केले आहे काय (नोंदणी ठिकाण )<br>(नोंदणी क्रमांक ) | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| | ख) प्रकल्पग्रस्त आहात काय ? (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही |
| | ग) भुकंपग्रस्त आहात काय ? (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही |
| | घ) धरणग्रस्त आहात काय ? (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही |
| | प) उमेदवार अपंग आहात काय ? (असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | अल्पदृष्टी/अस्थिव्यंग<br>कर्णबधीर/मुकबधीर |
| | फ) उमेदवार राज्यस्तरीय खेळाडू आहे काय? (प्रमाणपत्र जोडावे)<br>असल्यास खेळाचा प्रकार | होय / नाही |
| | ब) उमेदवार शासकीय कर्मचारी आहे काय ? असल्यास कुठे | होय/नाही कालावधी ...... |
| | र) उमेदवार अंशकालीन कर्मचारी आहे काय ? (प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही कालावधी ...... |

| 9. | राष्ट्रीयकृत बॅकेचे नांव | डी. डी. क्रमांक | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| 10. | शैक्षणिक अर्हता | संस्थेचे/मंडळाचे नांव | प्राप्त गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
| | एस.एस.सी (10 वी) | | | |
| | एच. एस.एस.सी (12 वी) | | | |
| | पदवी | | | |
| | पदव्युत्तर पदवी | | | |
| | पदाकरीता लागु असलेली पदवी | | | |
| | संगणक प्रमाणपत्र | | | |
| | ईतर अर्हता | | | |

| 11 | कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत थोडक्यात माहिती | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विभागचे नांव | पद | कालावधी | वेतन (माहे .. | सध्या कार्यरत आहे किवां नाही |
| | | | | | |

टिप :– 1) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अर्हतेचे प्रमाणपत्र तसेच तत्सम प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

2) दोन पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत जोडावे

**(उमेदवाराची स्वाक्षरी)**

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की आपले कार्यालयाकरीता ............................................................ ची पदे भरणेसंबधी जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याचे पृष्ठयर्थ मी प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जाहिरातील दिलेल्या क्रमानुसार सोबत जोडल्या आहे. व नमूद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरीता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतेही तक्रार राहणार नाही.

स्थळ :–

दिनांक :– **(उमेदवाराची स्वाक्षरी)**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना–अ**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना–अ (नियम 4 पहा)**

मी श्री. /श्रीमती/कुमारी ......................................................................................................... श्री. ..................................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ................................ वर्षे राहणार .................................................................................................. याव्दारे पूढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1) मी ................................................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला .................................................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 यांनतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................. आहे (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावी)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 2 मार्च 2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

स्थळ :–

दिनांक :– **(उमेदवाराची स्वाक्षरी)**

| |
|---|
| अविवाहित उमेदवारांनी नमूदना अ प्रतिज्ञापत्र लागु नाही असे करु स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसल्यास अर्ज अपुर्ण आहे असे समजुन रद्द ठरविण्यात येईल. |